दैनिक नवीन संध्या

RNI No.MAHMAR/2010/36460
DEC. No. SDM/SR/PUNE/87/2019

# एरोबिक मध्ये सिटी इंटरनॅशनलच्या वसुंधरा दिक्षितने पटकाविले कांस्यपदक



**पुणे :** सेंट्रल बोर्ड ऑफ़ सेंकडरी एज्युकेशनच्या (सीबीएसई) वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत वानवडीतील सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या वसुंधरा दिक्षितने कांस्य पदकावर मोहर उमटविली. एरोबिक प्रकारात तिने ही चमकदार कामगिरी केली.

अहमदनगर येथील समता इंटरनॅशनल स्कूल येथे १० ते १२ नोव्हेंबर या कालावधीत ही स्पर्धा पार पडली. देशभरातील ८६ शाळांमधील स्पर्धक यात सहभागी झाले होते. वसुंधरा दिक्षित सिटी इंटरनॅशनल स्कूल मध्ये इयत्ता नववी मध्ये शिकत आहे.